Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-XII Dec. 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# विदर्भातील आंतर महाविद्यालयीन शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंची चिंता, तणाव आणि सामाजिक आर्थिक स्तरांचा त्यांच्या खेळ कौशल्यावर होणार परिणामाचे अध्ययन

**Shri Sanjay Deshmukh**
Research Scholar

**Dr. Umesh Rathi**
Director Of Physical Education,
Arts College, Kurha, Dist. Amt.

## प्रस्तावना :–

**व्हॉलीबॉलचा इतिहास :** 9 फेब्रुवारी 1885 साली व्हॉली होक मसॅचुसेट्स यु.एस.ए. विलीम जी. मोरगन, वा.एम.सी.ए. येथील शारीरिक शिक्षण संचालकांनी एक नवीन खेळाची उत्पत्ती केली, त्याला त्यावेळी मिन्टोनेट म्हणायचे, हे एक पासटाईम खेळ होते व हिवाळयात जेव्हा मैदानावर बर्फ असायचे तेव्हा हा खेळ हॉल मध्ये खेळला जात असे व त्या खेळात भभाग घेणा–या खेळाडूंच्या सख्येवर बंदी नसे. कितीही खेळाडू हा खेळ खेळू शकत असे. या खेळाच निर्मितीसाठी बास्केट बॉल, बेसबॉल, टेनिस आणि हॅण्डबाल खेळांच्या कौशल्यांना आणि साहित्याचा उपयोग करून हा खेळ तयार करण्यात आला होता. या नवीन खेळाला मिन्टोनेट नाव देण्यात आले होते. 6 फूट 6 इंच उंचीवर नेट लावली व खेळाच्या प्रदर्शनाच्या वेळी कोणीतरी मोरगनला म्हटले, खेळाडू चेंडूला व्हॉली करतांना दिसतात ते नेट वरून चेडूंला इकडून तिकडे व्हॉली करीत आहेत म्हणून या खेळाला हॉलीबॉल नाव उपयुक्त होईल तेव्हा पासुन या खेळाला व्हॉलीबॉल नाव देण्यात आले. स्प्रींग मिल्ड कॉलेज वाय.एम.सी.ए. मध्ये पहिल्यांदा व्हॉलीबॉल खेळण्यात आले.

वाय.एम्.सी.ए., च्या ट्रेनिंग स्कुल मध्ये या खेळाचे नियम बदलण्यात आले आणि हा खेळ देशभर पसरला. 1900 मधे या खेळा करीता वेगळा बॉल तयार करणयत आला.

1995 साली व्हॉलीबॉल खेळाला 100 वर्ष पूर्ण झाले व आंतरराष्ट्रीय संघटना तयार करणयत आली व जागतिक स्तरावर सामने आयोजित होऊ लागले.

1951 साला पासुन (व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इन्डीया) चा तेजस्वी इतिहास आहे. व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इन्डीया दरवर्षी वरीष्ठ, युवा, ज्युनियर, सब ज्युनियर, मीनी, राष्ट्रीय स्पर्धा आयोजित करते. फेडरेशन इन्टरनॅशनल व्हॉलीबॉल दरवर्षी आंतर राष्ट्रीय पातळीवर पुरूष व महिला जागतिक अंजिक्यपद स्पर्धा, ज्युनियर जागतिक अंजिक्य पद स्पर्धा, आशिया खेळ, आशियाई वरिष्ठ पुरूष, महिला स्पर्धांचे आयोजन करते.

शोधकर्त्याने आपले शोध कार्यासाठी या लोकप्रिय खेळाच्या विद्यार्थ्यांची चिंता, तणाव आणि सामाजिक आर्थिक स्तरांचा त्याच्या खेळांच्या कौशल्यावर कशा प्रकारे परिणाम होतो हे पहाण्याचे ठरविले होते, त्या करीता शोधकर्त्याने जी समस्या शोधकार्यासाठी निवडली होती ती **विदर्भातील आंतर महाविद्यालयीन शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंची चिंता, तणाव आणि सामाजिक आर्थिक स्तरांचा त्याच्या खेळ कौशल्यावर होणा–या परिणामाचे अध्ययन** यावर हे शोधकार्य केले.

**उद्देश्य :**

1)विदर्भातील आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल खेळाडूंच्या चिंतेच्या स्तराची माहिती झाली.

2)खेळाडूंच्या खेळाच्या वेळाच्या तणावाची माहिती खेळांडूना व शोधकर्त्याला झाली.

3)सामाजिक, आर्थिक स्तरांची माहिती झाली.

4)शहरी खेळाडूंच व्हॉलीबॉल कौशल्याची माहिती कळली.

5)ग्रामीण भागातील खेळाडूंच्या व्हॉलीबॉल कौशल्या ची माहिती कळली.

शहरी व व्हॉलीबॉल खेळाडूंच्या खेळाच्या कौशल्यामध्ये त्याच्या कोणत्या घटकांचा परिणाम होतो याची माहिती कळली.

**नियंत्रित घटक :–** शोधकर्त्याने खालील घटकांना या शोधकार्यासाठी नियंत्रित केले.

1) या शोधकार्यासाठी विदर्भातील तीन अमरावती, नागपूर, गडचिरोली विद्यापीठातील आंतर महाविद्यालयातील व्हॉलीबॉल खेळाडू 100 शहरी आणि 100 ग्रामीण खेळाडूंची निवड करण्यात आली होती.

2) या शोधकार्यासाठी चिंता, तणाव, सामाजिक व आर्थिक स्तराची चाचणी निवडण्यात आली होती.

3) खेळाडूंच्या व्हॉलीबॉल खेळाचे कौशल्याकरीता व्हॉलीबॉल मस्कील टेस्टची निवड करण्यात आली होती.

**संशोधन र्कापद्धती :** संशोधन कार्याची पद्धतीचे वर्णन करण्यात आले आहे. त्यामध्ये नमुना निवड, प्रश्नावली बनविणे, माहिती गोळा करणे. व्हॉलीबॉलच्या कौशल्याचे स्कील टेस्ट खाली देण्यात आली आहे.

**नमुना निवड :–** शोधकर्त्यानी हे शोधकार्य व्हॉलीबॉल खेळाडूंवर असल्यामुळे, अमरावती, नागपूर, गडचिरोली विद्यापीठातील आंतर महाविद्यालयात सहभागी झालेले 100 शहरी व 100 ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडू या शोधकार्यासाठी निवडले होते.

**आकड्यांचे स्त्रोत :–** शोधकर्त्याने शोधकार्यासाठी जी समस्या निवडली होती त्यामध्ये व्हॉलीबॉल खेळाडूंची चिंता, तणाव व सामाजिक–आर्थिक घटकांचे परिणाम व्हॉलीबॉल खेळाडूंच्या खेळ कौशल्यावर होणार परिणामांचे अध्ययन असल्यामुळे आकडे गोळा करण्याकरीता शोधकर्त्याने सिन्हा यांची स्पोर्ट एन्झाइटी टेस्ट, आणि भारद्वाज यांची सामाजिक–आर्थिक स्तरांची चाचणी निवडली होती आणि आकडे गोळा करण्यात आले होते. खेळ कौशल्याकरीता व्हॉलीबॉल टेस्ट निवडण्यात आली होती. या सर्व आकड्यांचे वेगवेगळे तक्ते तयार करण्यात आले होते व त्या आकड्याचे साखीकिय विश्लेषण करून शोधकर्त्याने केलेल सर्व परिकल्पना तपासण्यात आले ते सर्व तक्तांचे सांखीकिय विश्लेषण देण्यात आले आहे.

शोधकर्त्याने चिंतेचे स्तर पहाण्याकरीता शहरी व्हॉलीबॉल खेळाडूंच्या चिंतेच्या स्तराची प्रश्नावलीची चाचणी घेऊन आकडे गोळा केलेत आणि त्याचे सांखीकिय विश्लेषण करून मध्यमान व मानक विचलण काढले ते खालील तक्ता कमांक 1 मध्ये देण्यात आले आहे.

**सांखिकीय विश्लेषण :**

शहरी आणि ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंच्या चिंतेचे, तणावाचे आणि सामाजिक–आर्थिक स्तरांच आकड्यांचे मध्यमान, मानक विचलन तक्ता 1 मध्ये दर्शविले आहे.

| क | व्हॉलीबॉल खेळाचे कौशल्य | शहरी व्हॉलीबॉल खेळाडू | | ग्रामिण व्हॉलीबॉल खेळाडू | | सांखिकिय टी | तक्ता मधील टी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मध्यमान | मानक विचलन | मध्यमान | मानक विचलन | | |
| 1 | चिंतेचे स्तर | 12.5 | 1.5 | 22.2 | 2.8 | 31.2 | 2.66, 0.01 level of significance & 99 degree of freedom |
| 2 | तणावाचे स्तर | 15.2 | 1.8 | 25.5 | 2.8 | 19.0 | |
| 3 | सामाजिक आर्थिक स्तर | 25.5 | 2.8 | 18.2 | 2.3 | 28.6 | |

स्पष्टिकरण :– वरील तक्ता कमांक 1 वरून स्पष्ट होते की शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंच्या चिंतेच्या स्तराचे मध्यमान कमशः 12.5 व 22.8 आहे, तर मानक विचलण कमशः 1.5 व 2.8 आहे त्यांच्यातील गणिती टी ची किंमत 31.2 आहे जेव्हा की तक्तमध्ये दिलेली टी ची किंमत 2.6, 0.01 लेव्हल ऑफ सिग्नीफिकन्स वर आणि 99 डिग्री ऑफ फ्रिडमवर आहे यावरून सिद्ध होते की शहरी व्हॉलीबॉल खेळाडूंच्या चिंतेचा स्तर ग्रामीण खेळाडूपेक्षा कमी आहे.
तणावाचे स्तरांचे शहरी व ग्रामीण खेळाडूचे मध्यमान 15.2 आणि 21.5 आहे तर मानक विचलण कमशः 1.8 व 2.8 आहे. गणिती टी ची किंमत 19.0 आहे जेव्हा की तक्तामधील टी पेक्षा मोठी आहे यावरून सिद्ध होते की शहरी व्हॉलीबॉल खेळाडूंवर तणाव जास्त नसतो.

सामाजिक–आर्थिक स्तरांचा शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंचे कमशः मध्यमान 25.5 व 18.2 आहे तर मानक विचलण कमशः 2.8 व 2.3 आहे. साखीकिय विश्लेषण करून जेव्हा गणिती टी काढली ती 28.6 आली जेव्हा की तक्तामधील टी ची किंमत 2.6, 0.01 लेव्हल ऑफ सिग्नीफिकन्स आणि 99 डिग्री ऑफ फिडमवर आहे म्हणजे गणिती टी ची किंमत तक्तामधील टी च्या किंमती पेक्षा जास्त आहे यावरून सिद्ध होते की शहरी व्हॉलीबॉल खेळाडूंचे सामाजिक–आर्थिक स्तर उच्च प्रतीचे आहे. वरील विवेंचना वरून सिद्ध होते की शहरी व्हॉलीबॉल खेळाडूंचे चिंतेचे स्तर, तणावाचे स्तर ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंपेक्षा कमी आहे तर सामाजिक–आर्थिक स्तर उच्च प्रतीचे आहे.

शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूचे व्हॉलीबॉल खेळाचे कौशल्य आफ AAHPERD व्हॉलीबॉल मस्किल टेस्ट द्वारा पहाण्यात आले त्यामध्ये वाल व्हॉली स्कील, पासिंग स्किल, सर्व्हीस स्कील आणि सेट अप स्कील हे चार स्कीलस् आहेत. त्या स्कीलस्चे परिक्षण शोधकर्त्याने केले व त्यांचे आकडे गोळा केलेत व त्या आकड्यांचे सायीकिय विश्लेषण करून मध्यमान व मानक विचलण काढण्यात आले, व्हॉलीबॉल खेळांचे कौशल्याची शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंची तुलना करण्याकरीता गणिती टी ची किंमत काढण्यात आली आणि त्याची तुलना तक्तमधील टी बरोबर करण्यात आली ती खालील तक्ता कमांक 2 मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता क्रमांक 2 :– शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंच्या व्हॉलीबॉल कौशल्यांच्या आकड्यांचे मध्यमान, मानक विचलन, गणिती टी आणि तक्ता मधील टी ची किंमत.**

| अक्र | व्हॉलीबॉल खेळाचे कौशल्य | शहरी व्हॉलीबॉल खेळाडू | | ग्रामिण व्हॉलीबॉल खेळाडू | | सांखिकिय टी | तक्ता मधील टी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मध्यमान | मानक विचलन | मध्यमान | मानक विचलन | | |
| 1 | बॉल व्हॉली स्कील | 27.5 | 3.1 | 18.8 | 2.4 | 24.7 | 2.66, 0.01 level of significance & 99 degree of freedom |
| 2 | पासिंग स्कील | 14.7 | 3.4 | 9.5 | 1.8 | 14.4 | |
| 3 | सर्विस स्कील | 8.7 | 1.7 | 61 | 1.9 | 104 | |
| 4 | सेट अप | 14.7 | 2.6 | 10.3 | 2.2 | 12.9 | |

स्पष्टिकरण :– वरील तक्ता क्रमांक 2 वरून स्पष्ट होते की शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंच्या व्हॉलीबॉल कौशल्यांच्या चाचणी द्वारे प्राप्त केलेल्या आकड्यांचे मध्यमान आणि मानक विचलण साखीकिय विश्लेषणाद्वारे काढल्यावर शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंचे व्हॉलीबॉल वाल व्हॉली कौशलचे मध्यमान कमशः 20.5 व 18.8 आहे तर मानक विचलण कमशः 3.1 व 2.4 आहे. आणि त्याच्यांतील गणिती टी ची किंमत 24.7 आहे जी तक्ता मधील टी 2.6,0.01 लेव्हल ऑफ सिग्नीमिकन्स आणि 99 डिग्री ऑफ फ्रिडम पेक्षा जास्त आहे यावरून सिद्ध होते की शहरी व्हॉलीबॉल खेळाडूंचे वाल व्हॉली कौशल्य हे ग्रामीण खेळाडूंच्या वाल व्हॉली कौशल पेक्षा जास्त चांगले आहे.
शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंच्या पासिंग स्कीलचे परिक्षण करून आकड्याचे मध्यमान व मानक विचलण काढले मध्यमान कमशः 14.7 व 9.5 आहे तर मानक विचलण कमशः 3.4 व 1.8 आहे. गणिती टी ची किंमत 14.4 आहे जी तक्ता मधील टी 2.6, 0.01 लेव्हल ऑफ सिग्लीमिकन्स आणि 99 डिग्री ऑम फ्रिडमवर आहे. गणिती टी ची किंमत तक्ता मधील टी ची किंमती पेक्षा जास्त आहे यावरून सिद्ध होते की शहरी व्हॉलीबॉल खेळाडू पासिंग कौशल्यात ग्रामीण व्हॉलीबॉल खेळापेक्षा उच्च प्रतीचे आहे.

शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंची सर्विस कौशल्याची चाचणी घेऊन आकड्यांचे सांखीकिय विश्लेषण केल्यावर मध्यमान काढण्यात आले व कमशः 8.7 व 6.1 आहे तर मानक विचलण 1.7 व 1.9 आहे. गणिती टी ची किंमत 10.4 आहे जी तक्तामधील टी पेक्षा मोठी आहे. शहरी व ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंचे व्हॉलीबॉल सेट अप स्कीलचे मध्यमान कमशः 14.7 व 10.3 आहे तर मानक विचलण कमशः 2.6 व 2.2 आहे. सांखीकिय विश्लेषणा नंतर गणिती टी ची किंमत 12.9 आली तर तक्ता मधील टी ची किंमत 2.6, 0.01 लेव्हल ऑफ सिग्नीफिकन्सवर आणि 99 डिग्री ऑफ फिडमवर आहे, गणिती टी ची किंमत तक्तामधील टी पेक्षा मोठी असल्यामुळे असे सिद्ध होते की शहरी खेळाडूंचे सेट अप स्कील ग्रामीण खेळाडू पेक्षा उच्च प्रतीचे आहे.

वरील सर्व विवेचणावरून सिद्ध होते की शहरी खेळाडूंचे व्हॉलीबॉल चे कौशल्य ग्रामीण खेळाडू पेक्षा जास्त उच्च प्रतीचे व चांगले आहे. त्यांचे चिंतेचे स्तर तणाव कमी आहे व त्यांची सामाजिक–आर्थिक परिस्थितीत चांगली असल्यामुळेही त्याचे व्हॉलीबॉल खेळाचे स्कील चांगले आहेत हे सिद्ध झाले. शोधकर्त्याने जी परिकल्पना केली होती ती सर्व मान्य झाल्या मुख्य परिकल्पना होती की विदर्भातील आंतर महाविद्यालयातील शहरी आणि ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूंची चिंता, तणाव व

सामाजिक–आर्थिक स्तरांचा त्यांच्या खेळ कौशल्यावर परिणाम आढळून येईल ही परिकल्पना मान्य झाली आहे.

**निष्कर्ष :–** शोधकर्त्याने खालील निष्कर्ष या शोधकार्याचे काढले आहेत.

1. शहरी खेळाडूंच्या चिंतेचा स्तर ग्रामीण खेळांडूपेक्षा कमी आहे.
2. शहरी खेळाडूंच्या तणावाचा स्तर ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडू पेक्षा कमी आहे.
3. शहरी व्हॉलीबॉल खेळाडूची सामाजिक आर्थिक स्तर ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूपेक्षा उच्च प्रतीची आहे.
4. शहरी व्हॉलीबॉल खेळाडूचे व्हॉलीबॉलचे कौशल्य ग्रामीण व्हॉलीबॉल खेळाडूपेक्षा उच्च प्रतीचे आहे
5. शहरी व्हॉलीबॉल खेळाडूंच चिंता, तणाव, सामाजिक–आर्थिक स्तरांचा प्रभाव तसेच व्हॉलीबॉल खेळाच कौशलवर पडून तो ग्रामीण खेळाडूंपेक्षा व्हॉलीबॉल खेळाचे कौशलपेक्षा उच्च प्रतीचा आहे.

वरील निष्कर्षा वरून शोधकतर्त्याने अशी शिफारस केली की ग्रामीण खेळांडूकरीता त्याच्या प्रशिक्षकांनी व शारीरिक शिक्षकांनी खेळाडूंच्या खेळाचे चिंतेचे स्तर व तणाव कमी करावा, त्यामुळे त्याच्या खेळाचे कौशलमध्ये वाढ होईल.

## संदर्भ सूची

1. मार्लीन एल. बसलार ॲट.ऑल., ''अरोझल ॲण्ड ॲक्झाटी को–रीलिटेड ऑम जिमनस्टीक परमारमन्स'', रीर्सच क्वार्टर्ली, व्हॉ.47,नं.4 डिसेंबर 1979 पृ.क'. 587–589.
2. किस्टाना एम. कैरी आणि इतर, ''साकोलॉजीकल ॲण्ड मिजीओलॉजिक चेन्जेस इन कॅम्पिटेटीव्ह स्टेट ॲन्झाटी नान कॉम्पुटेशन ॲण्ड कॉम्पुटेशन सक्सेस ॲण्ड मेल्युअर'' जनरल ऑफ स्पोर्ट ॲण्ड एक्झर साईज सॉइकोलॉजी, व्हॉ.12, नं.1, मार्च 1990, पृष्ठ क'. 6–20.
3. लॉरेन्स ग्रे कुमार, ''लेव्हल ऑम ॲनझाटी अमंग युनिव्हर्सीटी ॲथेलिट'', व्यायाम विज्ञान, वाल्युम .25, नं..3 अगस्त 1992, पेज 1–3.
4. डेव्हीस नीथ हिरोले, ''ॲन इन्टरप्रेटीव्ह स्टडी ऑम पोस्ट परमार्मन्स् स्ट्रेटस इन टेनिस प्लेअर्स'', डेझरटेशन ॲबस्ट्रक्ट इन्टरनॅशनल, व्हॉ.51 नं.3, 1990.
5. मॅाडमन, ''अपरेजन ऑम स्ट्रेस कोपिंग ॲण्ड परमार्मन्स ऑफ हायस्कुल स्टूडन्टस्'', डेझरटेशन ॲबस्ट्रक्ट इन्टरनॅशनल व्हॉ.50,नं.8,फेब्रुंवारी 1990,पृष्ठ क'.2430–अ.
6. डीहल, ''द इमेक्ट ऑम इमोशनल स्ट्रेस अप ऑन मोटर परमामन्स ऑफ मॅन्कशस ॲण्ड नॉर्म अन्कशस सबजेक्ट'' कम्पलीट रीर्सच, व्हॉ.8 नं.2,जुन 1966,पृष्ठ क'.186.
7. व्यंकटेश वागवाड, आधुनिक व्हॉलीबॉल तंत्र, कौशल्य एवंम् निमय, (श्री गजानन प्रकाशन प्रथम आवृत्ती पुणे पृष्ठ क'.51).
8. कोवाच अन्टा,क्लॉडाईन मार्गरीट, ''द इमेक्ट ऑफ फिजीकल ॲक्टीव्हीटी ऑन लेव्हल ऑफ डिप्रेशन, ॲन्झाटी ॲण्ड हापोकॉन्ड्रीासिस इन द एल्डरली'' हॉम स्टार ुनिव्हर्सीटी 0086 1998,129.
9. स्टोकडील, ''ए स्टडी ऑफ ज्युनिर हास्कुल बॉइज फिजीकल ुफिटनेस स्कोअर्स अज रीलेटेड टू द फॅमिली सोशल एकॉनॉमिक स्टेटस'' अनपब्लीशड थेसिस 1964
10.एम. देवलोन, स्पोर्टस ॲण्ड सोसाटीज, (फेन्डस पब्लीशर्स देहली 1969 पेज.नं.189).
11.पलविन्दर, ''ए कम्पारेटिव्ह स्टडी ऑफ सोशियो एकोनॉमिक स्टेटस ऑफ द प्लेअर्स पार्टीसिपेटिंग इन एक्स्लोन्सीव्ह ॲण्ड इन एक्पेन्सीव्ह गेमस'', (ॲनपब्लीशड पीएच डी. थेसिस पंजाबी ुनिव्हर्सिटी 1976).
12. अवन्ती, ''दिल्ली विश्वविद्यालतील कुस्तीमध्ये □भाग घेणा–या पहिलवांनाच्या सामाजिक–आर्थिक स्तराचे अध्ययन'', (स्नातकोत्तर डेझरटेशन अमरावती विद्यापीठ 1993).